रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

'विधी'-लिखित
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका

३

कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा 2005

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा

विजया रहाटकर

सदस्य

नीता राजेंद्र ठाकरे

सदस्य

गयाताई शिवाजीराव कराड

सदस्य

देवयानी ठाकरे

सदस्य

विंदा कीर्तीकर

सदस्य

ॲड. आशा लांडगे

पदसिद्ध सदस्य

सतीश माथूर
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव

डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

‘सुहिता’

तुमच्यासाठी आयोगाचा मदतीचा हात

संकटात आहात?
माहिती हवीय?

Helpline

७४७७७२२४२४

घाबरू नका..
सहन करू नका...

संपर्क साधा ‘सुहिता’वर

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची हेल्पलाइन

आयोगाशी संपर्क

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

प्रकाशक
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
म्हाडा भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी (०२२) - २६५९०७३९

मुखपृष्ठ, मांडणी
साहिल पब्लिकेशन
सुनील पाटील, वंदन पाटील
आनंदनगर, सिंहगड रोड.
९९२२९१३५८०, ९०११०८७४२९

मुद्रक
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परेल, मुंबई–१३

प्रथम आवृत्ती
मे २०१८

किंमत
संपूर्ण पुस्तक संच : १०० रूपये
प्रति पुस्तक : १० रूपये

'विधी'-लिखित
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका
३

महत्वाची सूचना :
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तिकेत सर्वसामान्यांना, विशेषतः महिलांना कायद्याची माहिती सुलभ भाषेत व्हावी, यासाठी हा मजकूर प्रकाशित करण्यात आला आहे. हा मजकूर म्हणजे मूळ कायद्याचा शब्दशः तर्जुमा नव्हे. कुठल्याही कायद्याचा अर्थ, अन्वयार्थ यासाठी मूळ इंग्रजी मसुदा व त्याचा अर्थच ग्राह्य धरला जाईल, याची वाचकांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

– प्रकाशक

भूमिका

प्रिय मैत्रिणींनो,
सस्नेह नमस्कार,

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित **'विधी'लिखित** या मालिकेतील ही तिसरी पुस्तिका आपल्या हातात देताना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. आपल्या देशात महिलांच्या हितासाठी अनेक कायदे केले गेले आहेत. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून काही कायदे अस्तित्वात आहेत. काळानुरूप त्यात बदलही होत गेले आहेत. देश स्वतंत्र झाल्यानंतर आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाने लिहिलेली आदर्श अशी राज्यघटना उपलब्ध झाली. आपल्या संसदेने या घटनेच्या मूळ तत्त्वांचा आधार घेत, महिलांच्या कल्याणासाठी अनेक नवे कायदेही केले. वेळोवेळी त्यात सुधारणा करण्यात आल्या. या सर्व कायद्यांची माहिती महिलांना असावी, यासाठीच सुलभ मराठीत त्या आणण्याचा हा आयोगाचा प्रयत्न आहे.

देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षे उलटून गेली असली आणि आपण आज एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात असलो, तरी महिलांवरील अत्याचारांमध्ये, अन्यायामध्ये वाढच होताना दिसते आहे. आईच्या गर्भातच स्त्रीचा भ्रूण खुडण्यापासून या अन्यायाला सुरुवात होते. जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत स्त्री वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक अत्याचार सहन करीत असते. जवळच्या आप्तांकडून होणाऱ्या बलात्कारासारख्या घृणास्पद कृत्यापासून ते कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापर्यंत तिला या अन्यायाला सतत तोंड द्यावे लागते. असमानतेची वागणूक, हुंड्यासाठी छळ, सासरी होणारी घुसमट, समाजात वावरताना स्त्री म्हणून सतत असुरक्षिततेची जाणीव, समाजाच्या योनीशुचितेच्या अवास्तव कल्पना आणि त्यातून उद्भवणारे वेगळेच अत्याचार अशा अनेक प्रकारांनी महिलांचा अनन्वित छळ होत असतो. काही ठिकाणी तर कल्पनेपलीकडे भयंकर अशा स्वरूपाचे हे अत्याचार होताना दिसतात.

एक जबाबदार लोकशाही देश म्हणून स्त्रीला समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कुचराई होत असेल, तर आपल्या न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहे. आपल्यासाठी कोणते कायदे आहेत आणि त्यांचा काय उपयोग आहे हे अनेकदा महिलांनाच माहिती नसते. या पुस्तिकांद्वारे किमान माहितीची ही उणीव दूर होईल, अशी आशा आहे. शक्यतो कायद्यांचा उपयोग करायची वेळ कुणावर येऊ नये, ही इच्छा आहे. मात्र, वेळ पडलीच तर महिलांनी याही आघाडीवर आपण सक्षम आणि निर्भय आहोत, हे दाखवून द्यावे, हाच या पुस्तिकांच्या प्रकाशनामागचा हेतू आहे. तिसऱ्या पुस्तिकेत **'कौटुंबिक हिंसाचार महिला संरक्षण कायदा २००५'** या कायद्याचा सविस्तर परिचय करून देण्यात आला आहे. तो आपल्याला उपयुक्त वाटेल, अशी आशा करते.

विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

सुटका कौटुंबिक हिंसाचारापासून

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा – २००५

भारतीय समाजात स्त्रीचे स्थान वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या स्वरूपाचे राहिले आहे. परंतु पितृसत्ताक पद्धतीच्या प्राबल्यामुळे बहुतांश काळात स्त्रीची अवस्था अबलेसारखीच होती. तिच्यावर अनेक प्रकारांनी अन्याय होत होते. खरे तर आजच्या काळातही या स्थितीत खूप फरक पडला आहे, असे नाही. आजही स्त्रीला हिंसाचार, अत्याचाराला तोंड द्यावे लागते.

आधुनिक काळात जगण्यातील नीतिमूल्यांच्या घसरणीमुळे आणि वाढत्या औद्योगिक विकासामुळे स्त्रीच्या अवहेलनेत वाढच झाली. याशिवाय ज्या कुटुंबात अथवा घरात ती स्वत:ला सुरक्षित समजते त्याच तिच्या घरात ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते आहे. या सर्व बाबींचा विचार करता आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री अत्याचार व कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी अनेक उपाय योजले गेले. भारतातही स्त्रीला कौटुंबिक हिंसाचारापासून सुटका मिळण्यासाठी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा २००५' करण्यात आला आहे.

जगातील प्रत्येक तीन स्त्रियांपैकी एकीलातरी मारझोड होते. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही

प्रत्येक सेकंदाला कुठल्यातरी महिलेला धमकावणे वा मारझोड होत असते. भारतीय महिलांची स्थिती तर याहीपेक्षा भयानक आहे. हे अपमानजनक चित्र बहुतांश भारतीयांच्या घरात, आजूबाजूला सुरू असते व ते आपण पाहतही असतो आणि सहनही करीत असतो.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने २००५ मध्ये अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर २००६ पासून तसा कायदा संपूर्ण देशभर (जम्मू-काश्मीर वगळता देशातील सर्व राज्यांना) लागू झाला. या कायद्यांमुळे महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देण्यात आले.

स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळ्या अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजपर्यंत खाली दिले गेलेले कायदे अस्तित्वात आहेत.

अ) भारतीय दंड विधान कायदा, १८६०

आ) हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

इ) सती प्रथा विरोधक कायदा, १९८७

ई) स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा, १९८६

ए) घटस्फोट कायदा, १८६९

ऐ) कुटुंब न्यायालय कायदा, १९८४

ओ) मुस्लिम महिलांसाठी कायदा, १९८६

औ) गर्भलिंग परीक्षण व गर्भपात विषयक कायदा

अशा प्रकारच्या निरनिराळ्या कायद्याअंतर्गत स्त्रियांना मिळणारे हक्क किंवा संरक्षण आणखीन प्रभावीपणे लागू होण्यासाठी हा नवीन 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५' निर्माण झाला. कौटुंबिक हिंसा ही घरात घडते ज्याला आपण आपल्या सर्वांचे सर्वात सुरक्षित स्थळ समजतो. आजपर्यंत बरेच स्त्री अत्याचारविषयक कायदे निर्माण झाले; परंतु घराच्या चार भिंतींआड होणारा हिंसाचार आजवर उपेक्षिलाच होता. ज्या महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्या आहेत. त्यांना त्यांच्या अधिकारांचा वापर अधिक सहज शक्य होण्यासाठी व त्यांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. आपल्या भारतीय प्रजासत्ताकाला ५६ वर्षे पूर्ण झाल्यावर अशा प्रकारचा महिलांना दिलासा देणारा कायदा अस्तित्वात आला. कुटुंबातील हिंसा या विषयावर सर्वेक्षण अहवाल सादर करणाऱ्या एका प्रसिद्ध लेखकाचे असे म्हणणे आहे, 'स्त्री ही काळोख्या रात्री सामसूम रस्त्यावर अनोळखी इसमासोबत एकदा सुरक्षित राहील; परंतु घराच्या चार भिंतींमध्ये आपल्याच घरच्या मंडळींमधे ती सुरक्षित असेलच असे नाही.' वाढत्या घरगुती हिंसाचाराचे हे एक अत्यंत ज्वलंत उदाहरण आहे. कौटुंबिक हिंसाचाराचे दृश्य हे सर्वदूर पसरलेले होते, पण लोकांच्या नजरेत भरून येण्याइतके व्याप्त नव्हते. बहुतेक स्त्रीविषयक कायदे व तरतुदी एकाच चौकटीत सामावून घेणारा हा कायदा आहे. या कायद्याचे नाव आहे – 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५'.

हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू झाला. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा नि:संशयपणे तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहे; तसेच तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखलपात्र विषय आहे. या टिप्पणीस

व्हिएतनाम समझोता, १९९४ आणि बीजिंग अधिघोषणाकृती समितीचे व्यासपीठ (१९९५) यांनी मान्यता दिली आहे. महिलांवरील भेदभाव संपूर्णपणे मिटविण्यासाठीच्या संयुक्त कृती समितीच्या १९८९च्या समान शिफारशींनुसार संबंधित देशांनी स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध संरक्षण पुरविण्यासाठी पावले उचलावीत आणि तसा कायदा निर्माण करावा; विशेष करून महिलांना कुटुंबात होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण देण्यासाठी कायदा करावा. म्हणून या संदर्भात आजवर राहून गेलेल्या सर्वबाजूंनी स्त्री शोषण थांबविण्यासाठीही हा ठोस व निर्णायक कायदा अस्तित्वात आला.

ठळक तरतुदी अशा

१) या कायद्याच्या प्रकरण २ कलम ३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या खूप विस्ताराने दिली गेली आहे. जसे कुठल्याही स्त्रीचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ तसेच लैंगिक शोषण, तोंडी किंवा शाब्दिक छळ, भावनात्मक छळ, मानसिक छळ, आर्थिक छळ या सर्वांचा समावेश या व्याख्येत होतो. शिवाय बेकायदेशीररीत्या हुंड्याची मागणी करून बायकोचा व तिच्या नातेवाइकांचा छळ या व अशा अनेक गोष्टींचा या व्याख्येत समावेश होतो.

२) या कायद्याअंतर्गत जी पीडित स्त्री आहे, त्या स्त्रीची व्याख्या खूप विस्तारित स्वरूपात मांडली आहे. उदा. ४९८ अ भारतीय दंड विधान या कलमाखालील पीडित स्त्री म्हणजेच लग्न झालेली स्त्री एवढाच होतो. येथे ही लग्न झालेली स्त्री तर येतेच; शिवाय अशा सर्व स्त्रिया ज्या कौटुंबिक संबंधात राहत आहेत किंवा कुणावर अवलंबून राहत आहेत. याशिवाय पीडितांमध्ये कुठलाही मनुष्य, स्त्री असो वा पुरुष, लहान मुले, आई–वडील, नोकर मंडळी किंवा कौटुंबिक संबंधात राहणारे कुणीही या कायद्याचा आश्रय घेऊ शकतात.

३) कोणतीही पीडित स्त्री किंवा बायको, जी प्रतिवादीसोबत विवाहासारख्या संबंधातून बांधली गेली आहे, ती आपल्या नवरा किंवा त्याच्या नातेवाइकांविरुद्ध तक्रार दाखल करू शकते. यासाठी तिला राज्य सरकार नियुक्त संरक्षण अधिकारी, पोलिस अधिकारी, सेवा देणारी पंजीकृत संस्था यांची मदत होईल. तशा प्रकारची तरतूद या कायद्याअंतर्गत झाली आहे. पोलीस अधिकारी, संरक्षण अधिकारी, सेवा देणारे संस्था यांचे कार्य आणि कर्तव्य सविस्तरपणे या कायद्यामध्ये दिले आहे. तसेच संरक्षण अधिकारी शक्यतो स्त्री असावी, अशीसुद्धा तरतूद आहे.

४) सेवाभावी संस्था (एनजीओ) यांची नेमणूक या कायद्याअंतर्गत अत्याचारित स्त्रीच्या मदतीसाठी करण्यात आली आहे. अशा प्रकारे पीडित स्त्रियांसाठी झटणाऱ्या सेवाभावी संस्थांना कायदेशीर हस्तक्षेपाला शिक्कामोर्तब झाला आहे. जी भूमिका ते आजवर पडद्याआडून करायचे ती यापुढे समोर येऊन करणार. या कायद्याच्या कलमानुसार ज्या व्यक्तीस कौटुंबिक हिंसाचार घडण्याची किंवा घडण्याच्या शक्यतेची माहिती द्यावयाची असेल तर तो ती माहिती संबंधित संरक्षण अधिकारी किंवा

यासंबंधी सेवा देणारी संस्था यांच्याकडे देऊ शकतो.

५) अत्याचारग्रस्त स्त्रीला लवकरात लवकर न्याय मिळावा या हेतूने तशा प्रकारची विशेष तरतूद या कायद्याअंतर्गत कलम १२(५) नुसार करण्यात आली आहे.

६) या कायद्याच्या प्रकरण चारमधे पीडित स्त्रीला साह्याचे आदेश मिळविण्यासाठीची कार्यप्रणाली दिली गेली आहे. कलम १२ नुसार पीडित व्यक्ती किंवा तिच्या वतीने संरक्षण अधिकारी याने न्यायदंडाधिकारी यांच्याकडे विविध साहाय्य मिळविण्यासाठीचा आदेश काढण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा.

७) पीडित स्त्रीला तिच्या हक्क बजावणीसाठी वेगवेगळ्या कायद्याअंतर्गत निरनिराळे दावे करण्याची आता गरज राहणार नाही. एकापेक्षा जास्त साह्याचे आदेश ती या एकमेव कायद्याखाली मागू शकते. या कायद्यामुसार न्यायाधीशांना पीडित स्त्रीच्या बाजूने संरक्षण आदेश काढण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या आदेशान्वये प्रतिवादीला कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंधित केले जाते.

संरक्षण आदेशाप्रमाणेच – अ) निवासी आदेश, आ) आर्थिक साह्यासंबंधी आदेश, इ) भरपाईचे आदेश, ई) ताबा देण्यासंबंधीचे आदेश, उ) अंतरिम किंवा एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार इ. तरतुदी पीडित स्त्रीच्या हक्क बजावणी व संरक्षणासाठी केल्या गेल्या आहेत.

८) प्रतिवादीकडून संरक्षण आदेश किंवा वर निर्देशित कोणताही आदेश किंवा न्यायालयाने संमत केलेल्या अंतरिम आदेशाचे उल्लंघन झाल्यास अशा व्यक्तीस एक वर्ष कैद किंवा वीस हजार रुपये दंड किंवा दोन्ही अशा स्वरूपात शिक्षा सुनावण्यात येऊ शकते.

असे आढळून आले, की प्रतिवादी हा भारतीय दंड विधान कलम ४९८ अ किंवा हुंडा–प्रतिबंधक कायद्यानुसार आरोपास पात्र आहे, तर तसे आरोप करण्यासंबंधीची तरतूद असेल. शिवाय न्यायाधीशांना सुधारित आदेश काढण्यासंबंधीचीसुद्धा तरतूद आहे. या कायद्याखालील गुन्हा हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा समजण्यात येतो.

९) फक्त पीडित व्यक्तीच्या जबानीच्या आधारावरच गुन्हा नोंदविला जाऊ शकतो व न्यायालय गुन्हा घडल्याचा निष्कर्ष काढून शिक्षा ठोठावू शकते.

कायद्याचा फायदा : सन २००५ मध्ये महिलांचे सरंक्षण अधिनियम या कायद्याला मंजुरी मिळाली. सन २००६ पासून या कायद्याची सर्वत्र अंमलबजाणी सुरू झाली. यात पाच प्रकारचे सरंक्षण तत्काळ देण्यात येते. त्यात शारीरिक, मानसिक, मुलांचा ताबा, आर्थिक नुकसान व रोजचा होणारा खर्च आदींचा समावेश आहे.

कशी होते अंमलबजावणी? : पोलिस ठाण्यात तक्रार देण्यास महिला धजावत नाहीत. त्यामुळे सुरुवातीला या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी तहसीलदार, बीडीओ, विस्तार अधिकारी, नायब तहसीलदार आदी अधिकार्यांवर सोपवण्यात आली. त्यांना या कायद्याप्रमाणे संरक्षण अधिकारी म्हणून अधिकार देण्यात आले. ग्रामीण भागात या कायद्याची

प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नंतर मात्र हे अधिकार त्यांच्याकडून काढण्यात आले.

यांच्यावर आली जबाबदारी : नंतर दोन व तीन फेब्रुवारी २०१२ रोजी झालेल्या स्वतंत्र शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण विभागाकडे जबाबदारी वर्ग करण्यात आली. संरक्षण अधिकारी म्हणून ग्रामीण भागात काम करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे सीडीपीओ (बालविकास अधिकारी) यांच्याकडे देण्यात आली.

कसे होते काम : या कायद्यान्वये कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला बालविकास अधिकार्यांकडे थेट तक्रार करू शकते. यासाठी कुठलाही खर्च लागत नाही. तक्रारीनुसार कौटुंबिक अहवाल (डीआयआर) तयार करून तो न्यायालयात सादर करणे आणि नंतर न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधिताला नोटीस बजावणे व महिलांना तत्काळ संरक्षण देण्याची जबाबदारी संबंधित अधिकार्याकडे असते.

अविवाहित महिलांसाठीही : या कायद्यानुसार विवाहित महिलेला आपल्या सासरच्या व्यक्तीविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार आहेच; शिवाय माहेरच्यांकडूनही हिंसा झाल्यास तसेच अविवाहित मुलीला भाऊ किंवा वडिलांविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार आहे. अर्थात या कायद्यानुसार आईविरुद्ध मुलीला तक्रार करता येत नाही.

अंमलबजावणीची स्थिती

कुटुंबांर्तगत स्त्रीवर होणारी हिंसा ही स्वतंत्र घटना नसते. या घटना घडल्यानंतर त्या तातडीने नोंदवल्या जात नाहीत. हिंसा करणाऱ्या व्यक्तींच्या घरात पीडित स्त्रीला पाठिंबा मिळणे ही गोष्ट अभावानेच बघायला मिळते. फौजदारी प्रक्रियेत गुन्हा घडल्याचे सिद्ध होईल, अशा ठळक साक्षी-पुराव्यांची गरज असते. पीडित महिलेच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम होणारे अत्याचार याचे मोजमाप कायद्याच्या चौकटीमध्ये उपलब्ध नव्हते. पोलिस ठाण्यात पीडित महिलेवर विश्वास ठेवून तक्रार दाखल करून घेण्यापेक्षा तडजोड करून तिला सासरी नांदायला पाठविण्यावर भर दिला जातो. खून, मारामाऱ्या, दंगली अशा प्रकारची प्रकरणे पोलिस हाताळत असतात. त्या तुलनेत नवऱ्याने बायकोचा अपमान करणे, तिला मारणे या बाबी पोलिसांच्या दृष्टीने किरकोळ वाटू शकतात. त्यामुळेच कौटुंबिक हिंसेकडे दुर्लक्ष होत होते. छळ करणाऱ्याला शिक्षा होण्यापेक्षा संरक्षण मिळविणे व त्यातून पुन्हा उभारी घेऊन पुन्हा आयुष्य सुरू करणे याला हिंसापीडित महिला प्राधान्य देतात.

शारीरिक छळामध्ये मारहाण, तोंडात मारणे, चावणे, लाथ मारणे, ढकलणे, जोरात धक्का देणे, गुद्दा मारणे, इतर कोणत्याही पद्धतीने शारीरिक दुखापत करणे, वेदना देणे या बाबींचा समावेश होतो. लैंगिक अत्याचारात जबरदस्तीने संभोग करणे, अश्लील फोटो काढणे, बीभत्स कृत्य करण्यास भाग पाडणे, महिलेची समाजात किंमत कमी होईल असे अश्लील चाळे करणे, बदनामी होईल असे कृत्य करणे या बाबींचा समावेश असतो. तोंडी आणि भावनिक अत्याचारामध्ये वाईट नावाने बोलवणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, हुंडा न आणल्याने अपमान करणे, हिंसापीडित

महिलेच्या मुलाला शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यास मज्जाव करणे, पीडित महिलेला व तिच्या मुलांना बाहेर जाण्यास मज्जाव करणे, आत्महत्येची धमकी देणे, नियमित कामासाठी कोणत्याही व्यक्तीस भेटण्यास मज्जाव करणे याचा समावेश असतो.

भारतीय दंड विधान संहितेमध्ये कटकारस्थान करणे, शासकीय कर्मचाऱ्यांना नुकसान पोहचविणे, खासगी मालमत्ता व जीविताला हानी पोहोचविणे, शांतता–सुव्यवस्थेला अडथळा आणणे अशा वेगवेगळ्या गुन्ह्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. व्यक्तीच्या जीविताला आणि मानवी शरीराला हानी पोचेल, या गुन्ह्यांच्या संदर्भात कलम २९९ ते ३७७ यामध्ये विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. हुंड्यासाठी होणारे छळ व छळाचे दखल घेण्यासाठी कलम ३०४मध्ये उपकलम ३०४ घालण्यात आले आहे. हुंड्यासाठी तिचा नवरा किंवा सासरची मंडळी यांच्याकडून छळ झाला आहे आणि त्यात तिचा मृत्यू झाला, असे उघडकीस आले, तर तो मृत्यू 'हुंडाबळी' असे मानले जाते. पीडित महिलेवर छळ झालेला नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपींची आहे.

आर्थिक अत्याचारात हुंड्याची मागणी करणे, पीडित महिला व तिच्या मुलांच्या पालनपोषणासाठी पैसे देणे, त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा (अन्न, वस्त्र व औषधे) पुरवठा न करणे, नोकरीला मज्जाव करणे, नोकरी स्वीकारण्यास मान्यता न देणे, पीडित महिलेच्या वेतनातून किंवा रोजगारातून आलेले पैसे बळजबरीने काढून घेणे, पीडित महिलेला तिचाच पगार वापरण्यास न मिळणे, घराचे भाडे न मिळणे यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय दंड विधान संहितेमध्ये विवाहासंदर्भात ४९३ ते ४९८ ही गुन्हे कलमे आहेत. कायदेशीर विवाह केल्याचे भासवून एखाद्या स्त्रीबरोबर शारीरिक संबंध प्रस्थापित करणे, पहिले लग्न झाले असताना दुसरे लग्न करणे, विवाहित महिलेबरोबर शारीरिक संबंध ठेवणे, विवाहित स्त्रीला डांबून ठेवणे या गुन्ह्यांची व्याख्या यामध्ये करण्यात आली आहे. आणि याची शिक्षा किती आहे याची माहिती देण्यात आली आहे.

हुंड्यामुळे विवाहित स्त्रियांचा होणार छळ, हत्या किंवा त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे या प्रकारच्या गुन्ह्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन १९८० नंतर महिलांना विविध प्रकारे संरक्षण देणारे कायदे करण्यात आले. आज सर्वसामान्यांच्या आणि पोलिस कर्मचाऱ्यांच्या मनातही '४९८ अ म्हणजे हुंडाबंदी' असे चुकीचे समीकरण फिट्ट बसले आहे. फक्त शारीरिकच नाही, तर मानसिक छळाची दखल या कायद्याअंतर्गत घेण्यात आली आहेत.

यात माधुरी चिटणीस प्रकरण हे महत्त्वाचे मानले जाते. नवरा चारित्र्यावरून संशय घेतो, घाणेरडे आरोप करतो हे क्रौर्य आहे म्हणून '४९८ अ'अंतर्गत प्रकरण दाखल करण्यात आले. या प्रकरणात कोर्टाने नवऱ्याला सहा महिन्याचा कारावास व तीन हजार दंड अशी शिक्षा सुनावली होती. सेशन कोर्टात तुरुंगवास कमी करून दंडाची रक्कम सहा हजार करण्यात आली. पीडित पत्नीने हायकोर्टाकडे धाव घेतली. पतीचे वय लक्षात घेऊन हायकोर्टाने त्याची तुरुंगवासाची शिक्षा कमी करून दंडाची रक्कम तीस हजारांपर्यंत वाढवली; तसेच ही रक्कम पत्नीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले. '४९८ अ' या कायदे कलमाच्या मर्यादाही आहेत. मंजुश्री सारडा, विभा शुक्ला, गीता गांधी अशा गाजलेल्या प्रकरणांमध्ये त्यांना त्यांच्या मृत्यूनंतरही न्याय मिळालेला नाही. हुंड्याच्या तीव्र प्रश्नामुळे अनेक प्रकरणे फौजदारी कायद्यात अडकून पडली होती.

हिंसाग्रस्त महिलेला तातडीची मदत, राहत्या घरातच सुरक्षित राहण्याचा हक्क आणि न्याययंत्रणेपर्यंत पोच वाढविणे यासाठी नव्या कायद्याची गरज होती. सर्व बाबींचा विचार करून 'कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण कायदा, २००५' तयार करण्यात आला. या कायद्याद्वारे पीडित महिलेला संरक्षण मिळू शकते. या कायद्याच्या आधारे पीडित महिला तिच्या व तिच्या मुलाविरुद्ध होणारे अत्याचार थांबवू शकते. स्त्रीधन, दागदागिने व कपडे इत्यादीवर ताबा मिळवू शकते. बँकेतील संयुक्त खाते किंवा लॉकर वापरण्यास हिंसा करणाऱ्या पुरुषाला प्रतिबंध केले जाऊ शकते.

पीडित महिला हिंसा करणाऱ्या पुरुषाच्या घरात राहत असेल, तर ते घर विकण्यालाही प्रतिबंध आणता येतो. वैद्यकीय उपचाराचा खर्चही मागू शकते. भावनिक किंवा शारीरिक हिंसाचारावरही नुकसानभरपाई महिलेला मागता येते. पीडित पत्नी, सासू, बहीण, मुलगी, अविवाहित स्त्री, आई, विधवा आदी कुठल्याही जाति-धर्मांच्या स्त्रिया व त्यांची १८ वर्षांखालील मुले या कायद्याअंतर्गत दाद मागू शकतात. या कायद्याअंतर्गत पीडित स्त्री पोलिस ठाणे किंवा दंडाधिकाऱ्याकडे तोंडी किंवा लेखी तक्रार करू शकते. कौटुंबिक हिंसाचाराच्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची दखल घेण्यासाठी आज आपल्याकडे दिवाणी स्वरूपाचा कायदा अस्तित्त्वात आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये सरकारची चालढकल, आवश्यक यंत्रणा तयार करण्यात झालेली दिरंगाई आणि या कायद्याबद्दल सर्वसामान्यांना असलेली तोकडी माहिती या सर्व मर्यादा आहेत. तरीही हा कायदा स्त्रियांच्या कौटुंबिक छळास प्रतिबंध करण्यासाठी महत्त्वाचा आहे.

कायद्याची वैशिष्ट्ये

कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कोणती महिला कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण मागू शकते, हे स्पष्ट करण्यात आले आहे. एकाच घरात पत्नी अथवा अन्य नाते संबंधाने एकत्र राहणाऱ्या महिला, लग्न अथवा 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये असणारी महिला, नवऱ्याविरुद्ध अथवा संबंधित

पुरुषाविरुद्ध संरक्षण मागू शकते. एकाच घरात राहणारी महिला ही बहीण, आई अथवा बायको किंवा विधवा स्त्री असू शकते. त्यांना पुरूषांच्या छळापासून संरक्षण मागता येते. महत्त्वाचे म्हणजे या कायद्यांतर्गत पुरुषांना महिलेविरूद्ध कौटुंबिक छळाची तक्रार करता येत नाही.

या कायद्यात कौटुंबिक हिंसाचार कशाला म्हणावे याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. महिलेचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ, तसेच शारीरिक, लैंगिक छळ, टोमणे मारणे, मानसिक आणि आर्थिक छळ तसेच हुंड्याची मागणी, त्यासाठी बायकोचा किंवा तिच्या नातेवाईकांचा छळ या बाबींना 'कौटुंबिक हिंसाचार' म्हटले आहे. मौखिक किंवा भावनिक छळामध्ये महिलेचा अपमान, कमी लेखण्याची कृती, टाकून बोलणे, शिव्याशाप देणे अथवा मूल होत नाही म्हणून उपहास करणे किंवा मुलगा होत नाही म्हणून सातत्याने अपमानित करणे किंवा इजा पोहचविण्याची वारंवार धमकी देणे या बींचाही कौटुंबिक छळात समावेश आहे.

स्त्रीधन, संयुक्त मालकीची घरगुती वस्तू, कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीचा व्यवहार करून त्यापासून पीडित महिलेला वंचित ठेवणे, कंपन्यांचे भाग, समभाग, ज्यात पीडित महिलेचा वाटा आहे किंवा संयुक्त मालकीची आहे पण त्यात तिला तिच्या हिस्सा न देणे; थोडक्यात स्त्रीला कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नापासून वंचित ठेवणे किंवा त्यावर बंदी आणणे किंवा सुविधा मिळू न देणे हेही 'आर्थिक छळ' समजले जातात. अशा स्वरूपाच्या कौटुंबिक छळाविरुद्ध महिला संबंधित पुरुषाविरुद्ध वा त्याच्या नातलगांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत संरक्षण मागू शकते.

कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक राज्याने संरक्षण अधिकारी (**Protection Officers**) आणि सेवा पुरविणाऱ्या संस्था (**Service Providers**) नियुक्त कराव्यात, अशी तरतूद कायद्यात आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारनेही संरक्षण अधिकारी व सेवा देणाऱ्या संस्थांची नियुक्ती केली आहे. पीडित महिलेने संरक्षण अधिकाऱ्याकडे तक्रार केल्यास संरक्षण अधिकारी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांकडून छळ करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध छळ प्रतिबंध करण्याची नोटीस घेऊन ती संबंधित पोलिस ठाण्यास दिली जाते आणि त्या व्यक्तीला पीडित महिलेचा छळ करण्यास प्रतिबंध केला जातो. या कायद्यांतर्गत पीडित महिलेबरोबर तिची १८ वर्षांखालील मुले वा दत्तक घेतलेली मुले यांनाही संरक्षण मिळते.

या कायद्यातील तरतुदींमुळे स्त्रियांना घरातून बाहेर काढता येत नाही. तसे केल्यास त्यांना राहण्यासाठी संबंधितांस पर्यायी व्यवस्था करावी लागते. गरज असल्यास छळ करणाऱ्याला घरात किंवा पीडित महिलेच्या कामाच्या ठिकाणी जाण्यास मज्जाव केला जातो. तिच्याशी संपर्क साधण्यास मनाई केली जाते.

दुसरे म्हणजे पीडित महिलेस वैयक्तिक सुविधा, कायद्याविषयक मदत, वैद्यकीय मदत, मानोसोपचार तज्ज्ञाच्या सेवा, सुरक्षित आश्रय आदी गोष्टी संरक्षण अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्या संस्थेमार्फत दिल्या जातात.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत पीडित महिलेला तिच्या पतीकडून आर्थिक साह्याचा आदेश (दैनंदिन देखभाल खर्च) न्यायदंडाधिकारी देत असल्यामुळे आर्थिक लाभापासून तिला वंचित ठेवता येत नाही. तिचे स्त्रीधन तर तिला मिळतेच; त्याशिवाय तिला किंवा तिच्या वतीने न्याय मागणाऱ्या व्यक्तिला दैनंदिन खर्चाच्या पूर्ततेसाठी, शारीरिक, मानसिक

हानीची नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायदंडाधिकारी देतात.

राज्य सरकारच्या उपाययोजना

पीडित महिलांना कौटुंबिक छळापासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत.

महिलांना संरक्षण, मार्गदर्शन मिळावे आणि कौटुंबिक हिंसाचाराला आळा बसावा म्हणून महिला व बाल विकास विभागाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (३५) आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी (४५९) यांना तात्पुरते 'संरक्षण अधिकारी' (प्रोटेक्शन ऑफिसर) म्हणून घोषित केले आहे.

सरकारने जिल्हास्तरावरील पोलीस ठाण्यांमध्ये ३९ समुपदेशन केंद्रे निर्माण केली आहेत. या समुपदेशन केंद्रात सरकारने तालुका स्तरावरील पोलिस ठाण्यांमध्ये आणखी १०५ समुपदेशन केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पत्नी, पतीला, तसेच कुटुंबालाही समुपदेशन करून कौटुंबिक कलह मिटविण्याचा प्रयत्न केला जातो.

जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर महिला आयोगाच्या सहमतीने ग्रामविकास विभागांतर्गत अंदाजे तीनशे समुपदेशन केंद्रे कार्यान्वित आहेत. तेथेही समुपदेशनाची सोय आहे. शिवाय संबंधित पोलिस ठाण्यात पीडित महिला तक्रार करू शकतात. राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसावा म्हणून १०९१ हा टोल फ्री दूरध्वनी क्रमांक प्रत्येक पोलिस ठाण्यात सुरू करण्यात आला आहे. पीडित महिला या टोल फ्री नंबरवर कौटुंबिक छळापासून संरक्षण मिळविण्यासाठी दूरध्वनी करू शकतात.

महिलांच्या हक्कांसाठी, शोषणाविरुद्ध, भेदभावाविरुद्ध आजवर अनेक पुरोगामी कायदे करण्यात आले आहेत. अलीकडेच केंद्रीय मंत्रिमंडळाने पुरुषांच्या संपत्तीत महिलांना हक्क देण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. हे विधेयक संसदेने नुकतेच मंजूर केले आहे. महिलांना तोही अधिकार मिळेल. नोकरीत आरक्षण, राजकीय आरक्षण, बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, स्त्री-भ्रूणहत्येविरुद्ध कायदा आदी अनेक उपाय व कायदे सरकारने केले आहेत.

कारणे व उपाय

संयुक्त कुटुंबात महिला राहण्यास बऱ्याचदा तयार होत नाहीत. त्यांना नवऱ्याकडचे नातेवाइक नको असतात. त्यातून अनेक वाद उद्भवतात. दुसरे म्हणजे एकत्र कुटुंबात सासूचा वरचष्मा, नणंदेचा जाच हेही कारण कौटुंबिक हिंसाचारास कारणीभूत ठरते. सर्वांचाच विपरीत परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होतो. म्हणून कुटुंबातील सर्वांनाच समुपदेशनाची गरज निर्माण होते. स्त्रीचा जन्म होण्यापूर्वीच तिला दुय्यम दर्जाची, भेदभावाची वागणूक दिली जाते. स्त्री म्हणजे परक्याचे धन, प्रगतीमधील धोंडा, ओझे असे मानले जाते. स्त्रीमुळे सग्यासोयऱ्यांपुढे मान तुकवावी लागते, स्त्री धार्मिक कार्यात नको, कारण ती अपवित्र अशी किती तरी कारणे दिली जातात. मुलगी नकोशी

म्हणून भ्रूणहत्या, मानसिक व शारीरिक छळ, तिचे सर्वंकष शोषण, हुंडाबळी, सती अशा अनेक माध्यमांतून स्त्रियांना दडपून ठेवून त्यांना गुलामाप्रमाणे, वस्तूप्रमाणे वागणूक दिली जाते. खरे तर हे मानवाधिकाराचे उल्लंघन आहे. म्हणून कौटुंबिक हिंसाचार हा मानव अधिकाराचाच विषय आहे. महिलांना कौटुंबिक छळापासून संरक्षण देणारा कायदा तिचा आत्मसन्मान, समान दर्जा नक्कीच तिला देऊ शकतो. परंतु महिलांनी कौटुंबिक अत्याचार सहन न करता अत्याचाराविरुद्ध निभर्यपणे पुढे यायला हवे.

या कायद्यातील कलम १२ नुसार पीडित स्त्री स्वत: अथवा तिच्या वतीने इतर व्यक्ती प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे अर्ज करून संरक्षण मागू शकते. असे अर्ज आल्यास न्यायाधीश त्या स्त्रीला संरक्षण देण्याचे आदेश देऊ शकतात. या कायद्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे कलम १७ प्रमाणे संबंधित न्यायालय नवऱ्याच्या घरात राहण्याचा अधिकार पीडितेला देते. कलम १८ नुसार पीडित महिलेवर कोणताही अत्याचार न करण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते. कलम २० नुसार पीडित महिला आणि तिच्या मुलांना पोटगीचा अधिकार देण्यात आला आहे. कलम २५ नुसार पीडित महिला पोटगी मागण्यास पात्र आहे. या कायद्यानुसार पीडित महिला नुकसानभरपाई, वैद्यकीय खर्च आणि कुटुंबाने घरातून बाहेर काढल्यास घरभाडे देण्याचे आदेश न्यायालय देऊ शकते. पीडित महिला नोकरी करत असल्यास तिच्या कामाच्या ठिकाणी जाण्यापासून पती आणि इतर नातेवाइकांना न्यायालय मज्जाव करू शकते.

विशेष नोंद

घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा, २००५ पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतो. त्यामुळे २००५ पूर्वीचे खटलेही या कायद्याच्या कक्षेत येतात, असा निर्वाळ देत मुंबई उच्च न्यायालयाने या कायद्याअंतर्गत दाखल करण्यात आलेल्या १९८२ च्या प्रकरणातील पीडितेच्या बाजूने निकाल दिला आहे.

नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

कायदा कशासाठी?

कुटुंबातील कोणत्याही पुरुष नातेवाइकाकडून स्त्रीचा शारीरिक वा मानसिक, आर्थिक, सामाजिक वा इतर प्रकारचा छळ होत असेल, तर या कायद्यांतर्गत स्त्रीला दादच नाही तर संरक्षणही मागता येते.

संरक्षण कोण देईल?

या कायद्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात संरक्षण अधिकारी नेमण्यात येतील. विशेषत: हे संरक्षण अधिकारी विशेष प्रशिक्षित व अनुभवी स्त्रियाच असतील; तसेच पीडित महिलांना मदतीसाठी काही सेवाभावी संस्थाही नेमण्याची व्यवस्था आहे.

कौटुंबिक छळ/हिंसाचार म्हणजे काय?

- एकाच घरात राहणार पुरुष नातेवाईक जर स्त्रीला मारहाण, शिवीगाळ करत असेल.
- तिला हुंड्याच्या मागणीवरुन धमकावीत असेल, घरातून हाकलत असेल.
- दारू वा इतर नशेमुळे मारहाण करत असेल, तिच्याकडून पैसे घेत असेल, घरातले सामान विकत असेल.
- तिला दररोज लागणार्या गरजांपासून वंचित करत असेल...
- तर त्याला कौटुंबिक छळ/हिंसासार म्हणता येईल.

कोणकोणत्या पुरुष नातेवाइकांविरुद्ध दाद मागता येते?

- स्त्रीचा नवरा, लग्न न करता एकत्र नवरा–बायकोसारखे राहत असतील तर तो पुरुष, सासरा, दीर
- इतर रक्ताची नाती असलेली म्हणजे नवर्याचा काका, मामासुद्धा.

महत्त्वाची अट

जी स्त्री पुरुषाविरुद्ध दाद वा संरक्षण मागते, ते दोघे जणही एकाच घरात/कुटुंबात राहत असले पाहिजेत वा कधी एके काळी राहत असतील तरच दाद मागता येईल.

संरक्षण मागण्यासाठी काय करावे लागेल?

- एखाद्या स्त्रीचा पती, जोडीदार वा कुटुंबीयांकडून छळ होत असेल तर कोणीही जबाबदार व्यक्ती, स्वत: स्त्री, तिचे नातेवाइक संरक्षण अधिकार्यांना संबधित छळाबद्दल माहिती देऊ शकतात.
- जी व्यक्ती माहिती देते तिच्यावर कोणताही दिवाणी वा फौजदारी दावा, माहिती दिल्यामुळे दाखल होणार नाही.
- अशी माहिती मिळाल्यावर संबंधित पोलिस वा संरक्षण अधिकार्यांना प्रत्यक्ष छळल्या जाणार्या स्त्रीला भेटून तिला उपलब्ध असलेल्या कायद्याच्या संरक्षणाची माहिती द्यावी लागले व मदतही करावी लागेल.

कशा प्रकारचे संरक्षण मिळते?

- संबधित संरक्षण अधिकारी वा सेवाभावी संस्था पीडित स्त्रीला तिला उपलब्ध कायदेशीर हक्कांची पूर्णपणे माहिती देऊन, त्यातील तिच्या तक्रारीप्रमाणे योग्य हक्काच्या संरक्षणसाठी अर्ज तयार करून त्या कार्यक्षेत्रातील मॅजिस्ट्रेटकडे सादर करील.
- पीडित स्त्रीने तिच्या राहण्याची सोय करावी, अशी विनंती केल्यास तर तिची सोय महिला आधारगृहात करता येईल.
- तिला आवश्यक ती आरोग्यसेवाही मिळवून देता येईल.
- न्यायालयाला असा अर्ज प्राप्त झाल्यावर तीन दिवसांच्या आत त्यावर पहिली सुनावणी करावी लागते.

तिला काय हक्क आहेत?

- संरक्षण आदेश, आर्थिक स्वरूपात नुकसानभरपाई, घरात राहू देण्याबद्दलची परवानगी व इतर सवलती, ती न्यायालयाला अर्ज करून मागून घेऊ शकते.
- ती ज्या कुटुंबात राहत होती तिथेच राहू देण्यात यावे, अशी मागणी ती करू शकते.
- खटला चालविण्यासाठी वा इतर कायदेशीर मदतीसाठी न्यायालयात असलेल्या मोफत कायदे सल्ला केंद्राचीही मदत घेऊ शकते.
- भारतीय दंडविधान कायद्याच्या ४९८ अ कलमाखली पोलिसांना तक्रार दाखल करू शकते.

वरील उपलब्ध संरक्षण व हक्कासाठी काय प्रक्रिया आहे?

स्वत: पीडित स्त्री व संरक्षण अधिकारी या कायद्यांतर्गत उपलब्ध वेगवेगळे हक्क मिळविण्यासाठी न्यायालयात अर्ज करुन विनंती करू शकतात आणि न्यायालय अशा अर्जाचा निकाल ६० दिवसांतच देण्यास बांधील आहे.

संरक्षण आदेश म्हणजे काय?

- अशा आदेशाद्वारे प्रतिवादी माणसाला पीडित स्त्रीवर हिंसाचार करण्यापासून, हिंसाचाराला प्रवृत्त करण्यापासून, पीडित स्त्रीच्या नोकरीच्या जागी जाण्यापासून; तसेच तिच्यासोबत कोणत्याही प्रकारचा संपर्क करण्यापासून, पीडित स्त्रीच्या मुलांना वा इतर नातेवाइकांनादेखील त्रास देण्यापासून प्रतिबंधित करण्यात येते.
- अशा स्त्रीच्या बँक खात्यातील रक्कमेबरोबर/कागदपत्रांबरोबर छेडछाड करता येणार नाही. (त्यात संयुक्त खात्याचाही अंतर्भाव होतो) वा अशा मालमत्तेची बेकायदेशीरपणे विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंधित करण्यात येईल.
- या संरक्षण आदेशाची अंमलबजावणी करण्याचे काम जवळच्या ठाण्यातील पोलिसांचे असेल.

तक्रार केली म्हणून स्त्रीला घरातून बाहेर काढले तर?

- वरील आदेशासोबतच न्यायालय, पीडित स्त्रीला जर प्रतिवाद्याच्याच घरात राहायचे असेल, तर त्या घरातून हाकलता येणार नाही हा आदेश प्रतिवाद्याला देऊ शकेल.
- तसेच हिंसाचार रोखण्यासाठी प्रतिवाद्याला घर सोडण्यास न्यायालय सांगू शकते.
- ती राहते त्या घरात प्रतिवादी व त्याच्या नातेवाइकांना जाण्यास मनाई करू शकते.
- प्रतिवाद्याला अशा घराची विल्हेवाट तर लावताच येत नाही (म्हणजे परस्पर घर भाड्याने देणे, विकणे इ.) पण जर संबंधित घर भाड्याने असेल तर भाडेही द्यावे लागते.

आर्थिक भरपाई मिळते का?

- हो. वरील अर्जाचा निकाल देतानाच न्यायालये त्या स्त्रीला आर्थिक नुकसानभरपाईचे आदेश प्रतिवाद्याविरुद्ध देऊ शकते.
- तिची नोकरी किंवा मिळकत बंद झाल्यास, औषधपाण्याचा झालेला खर्च, तिच्या राहत्या घराचे प्रतिवाद्याने नुकसान केल्यास त्यासाठीचा खर्च, व तसेच कलम १२५ फौजदारी संहितेअंतर्गत मिळालेल्या पोटगीव्यतिरिक्त संबंधित स्त्रीसाठी व

तिच्या मुलांसाठी अतिरिक्त पोटगी मिळू शकते.

- मुलांचा ताबाही, तात्पुरता का होईना, स्त्रीकडे देण्याचा आदेश न्यायालये देऊ शकते.

असे आदेश किती दिवसापर्यंत अंमलात असतील?

जोपर्यंत संबंधित पीडित स्त्री परिस्थितीत सुधार झाला आहे आणि त्या माणसाची वागणूक चांगली झाली आहे, असा अर्ज करीत नाही तोपर्यंत आदेश अंमलात असतील.

प्रतिवाद्याने आदेशाचे पालन न केल्यास काय होईल?

प्रतिवाद्याने न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्यास एक वर्षापर्यंत कैद व २० हजार रुपयांपर्यंत दंड ही सजा होईल.

संरक्षण अधिकार्याने कर्तव्य पार पाडली नाहीत तर?

त्यांनाही एक वर्ष कैद व २० हजार रुपयांपर्यंत दंड ही शिक्षा होईल.

विशेष नोंद : या कायद्यांतर्गत नमूद सर्व गुन्हे अजामीनपात्र व दखलपात्र आहेत.

'घरगुती हिंसाचार या शब्दप्रयोगाचा खरा अर्थ काय?

घरगुती हिंसाचाराची व्याख्या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये विस्तृत पणे करण्यात आले आहे, या अधिनियमाच्या अंतर्गत कोणतेही कृत्य किंवा कोणतेही वर्तन ज्यामुळे पीडित महिलेस शारीरिक, तसेच मानसिकरीत्या नुकसान किंवा इजा पोहोचेल किंवा ज्यामुळे तिच्या जीवास आणि आरोग्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करणारी असेल, असे कृत्य किंवा वर्तन घरगुती हिंसाचाराच्या अंतर्गत येते, ज्यात क्लेश, धमकी, अनाचार, हुंडा किंवा संपत्तीची अयोग्य (अनुसूचितपणे) मागणी आणि पीडित व्यक्तीच्या सुरक्षिततेस धोका यांचाही समावेश आहे. शारीरिक शोषण, मानसिक शोषण, आर्थिक शोषण, भावनात्मक शोषण आणि लैंगिक शोषण या अंतर्गत येतात.

या अधिनियमांतर्गत फिर्यादी किंवा बळी (पीडित व्यक्ती) कोण?

कोणतीही अशी स्त्री, जी घरगुती हिंसाचाराने व्यथित आहे आणि अन्य व्यक्ती जिच्याकडे घरगुती हिंसाचारासंबंधी माहिती आहे अशी व्यक्ती.

घरगुती नाते (संबंध) म्हणजे काय?

घरगुती नात्याचा अर्थ समगोत्रता विवाह, विवाहाच्या स्वरूपाने नाते, दत्तक संबंध अथवा संयुक्त परिवार असा आहे, जेथे दोन्ही पक्ष घरांत एकत्र राहतात.

या अधिनियमांतर्गत, एक स्त्री जिचा पुरुषाशी विवाह झालेला नाही, परंतु ती त्याच्यासोबत राहत असेल तर ती संरक्षणाकरिता पात्र आहे का?

हा अधिनियम, अशी स्त्री जी दुसऱ्या पक्षासोबत (व्यक्ती) विवाहस्वरूप समान नात्याने संबंधित असेल, अशा स्त्रीला या अधिनियमांतर्गत संरक्षण प्राप्त आहे.

सामायिक (एकत्र) घर म्हणजे काय?

सामाईक घर म्हणजे ज्यात पीडित महिला दुसऱ्या पक्षासोबत घरगुती संबंधांमुळे राहत आहे किंवा राहत होती. यांत भाडेतत्त्वावरील किंवा स्वतःचे घर किंवा सामायिक मिळकत ज्यावर पीडित किंवा प्रतिवादीचा कोणताही अधिकार असेल, अशा घरांचाही सामावेश आहे. डिसेंबर २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला आहे. ज्यानुसार सामायिक घराच्या व्याखेत कोणत्याही महिलेच्या सासूद्वारा अर्जित (प्राप्त/संपादित) वैयक्तिक मिळकतीचा समावेश होत नाही.

एकत्र कुटुंबात राहणाऱ्या महिला सदस्यांना संरक्षण देता येते का?

एकत्र कुटुंबात राहणाऱ्या महिला–बहीण, विधवा आणि आईलासुद्धा या अधिनियमांतर्गत संरक्षण प्रदान करता येईल.

अधिनियमांतर्गत प्रतिवादी कोण आहे?

प्रतिवादीच्या अर्थाचा संबंध कोणत्याही अशा प्रौढ पुरुष व्यक्तीशी आहे ज्याचे पीडित महिलेशी कौटुंबिक नात्यांतर्गत घरगुती नाते आहे आणि ज्याच्याविरुद्ध पीडा निवारण दाद (अनुतोष) मिळविण्यासाठी या अधिनियमांतर्गत निवेदन (अर्ज) करण्यात आले आहे, अशी व्यक्ती.

या कायद्यांतर्गत, पुरुषांच्या सुरक्षिततेसाठीही कोणता विकल्प आहे का?

नाही, ज्या अर्थी या अधिनियमाचे शीर्षक असे सुचवत आहे की, हा अधिनियम केवळ महिलांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षण प्राप्त करून देतो. पती/पुरुष, सहकारी ज्याच्यावर अन्य पुरुष किंवा महिला सदस्यांद्वारा कोणत्याही स्वरूपाने नुकसान, हानी किंवा सतावणी करण्याचा आरोप आहे त्याला अधिनियमांतर्गत कोणत्याही प्रकारची सुरक्षितता प्रदान करण्यात आलेली नाही.

घरगुती हिंसाचारापासून सुरक्षिततेकरिता कोणकोणते अधिकार नियुक्त करण्यत आले आहेत?

घरगुती हिंसाचारपासून पीडितांना सेवा प्रदान करण्यासाठी सुरक्षा अधिकारी आणि अशासकीय संस्था यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सुरक्षा अधिकारी कोण? आणि त्याचे कर्तव्य कोणते?

सुरक्षा अधिकारी म्हणजे असा अधिकारी ज्याची नियुक्ती या अधिनियमाच्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात राज्य सरकारद्वारे करण्यात आली आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ज्या त्या क्षेत्राच्या आवश्यकतेवर अवलंबून आहे. सुरक्षा अधिकारी घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात एक महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतो. घरगुती हिंसाचारापासून पीडित सर्व स्त्रियांना संरक्षण व पीडा निवारणाची खात्री देण्याकरिता सुरक्षा अधिकारीच मुख्य व्यक्ती आहे.

त्यांची कर्तव्य पुढीलप्रमाणे

- या अधिनियमांतर्गत न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशांचे अनुपालन करणे आणि त्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी महिलेस साह्य करणे.
- घरगुती हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल दंडाधिकाऱ्यांना सादर करणे.
- पीडित महिलेस अर्ज तयार करण्यास मदत करणे.
- विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ अंतर्गत पीडित महिलेस विधी सेवा उपलब्ध करून देणे.
- पीडित व्यक्तीस इजा झाल्यास, तिची वैद्यकीय तपासणी करवून घेणे.
- सेवा प्रदान करणाऱ्या संस्थांची सूची तयार करणे.
- आवश्यक असल्यास, पीडित महिलेसाठी सुरक्षित आश्रयाची व्यवस्था करणे.
- दंडाधिकाऱ्यांद्वारा पीडित महिलेस आर्थिक अनुतोष मंजूर करण्यात आल्यास, त्याबद्दलची अंमलबजावणी करवून घेणे.

सेवा प्रदान करणाऱ्या संस्था कोणत्या?

अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही स्वेच्छा संघटना, जी 'संस्था नोदणी अधिनियम, १९६०'अंतर्गत नोंदणीकृत आहे किंवा कोणतीही कंपनी अधिनियम १८५६ अंतर्गत नोंदणीकृत आहे, अशी स्वेच्छा संघटना राज्य सरकार समक्ष संस्थेच्या स्वरूपात सेवा प्रदान करण्यासाठी, स्वत:ला नोंदणीकृत करू शकते, अशा संस्थेचा उद्देश महिलांचे हित आणि अधिकार यांचे रक्षण करणे, असे असणे आवश्यक आहे. ज्यात विधी सेवा, वैद्यकीय, आर्थिक व इतर साह्य व सेवा यांचा समावेश आहे.

सेवा प्रदान करणाऱ्यांना कोणकोणते अधिकार प्रदान करण्यात आले आहेत?

सेवा प्रदान करणाऱ्यांना, घरगुती हिंसाचाराच्या घटनेचा तपशील ठेवणे; तसेच आवश्यक वाटल्यास, पीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करवून घेणे आणि आवश्यक असल्यास तिच्या सुरक्षित आश्रयाची खात्री करून देणे असे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

अधिनियमांतर्गत सुरक्षा अनुतोष प्राप्त करण्यासाठी काय प्रक्रिया आहे?

पीडित व्यक्ती सुरक्षा आधिकारी अथवा पीडित व्यक्तीच्या आधारावर कोणतीही अन्य व्यक्ती दंडाधिकाऱ्यांसमक्ष पीडा निवारणाकरिता आणि संरक्षण प्राप्त करण्याकरिता आवेदन (अर्ज) करू शकते. पीडित व्यक्ती आणि प्रतिवादीची सुनावणी केल्यानंतर दंडाधिकारी याबाबत पुढीलपैकी योग्य तो आदेश देऊ करू शकतात.

- सुरक्षा आदेश,
- निवासासंबंधीचा आदेश,
- अन्य आर्थिक अनुतोष, जसे की संपादनासंबंधी (उत्पन्न) हमी, वैद्यकीय खर्च, संपत्तीचे नुकसान, भरण–पोषण इत्यादी कारणांकरिता आर्थिक अनुतोष,
- अंतिम अभिरक्षा आदेश,
- क्षतिपूर्ती आदेश, जसे की इजेमुळे होणारे नुकसान, ज्यांत मानसिक व भावनिक हानी जी पीडित व्यक्तीच्या दु:खाचे कारण आहे, त्यांचासुद्धा समावेश आहे.

अधिनियमाअंतर्गत पीडित व्यक्ती इतर कोणकोणती भरपाई प्राप्त करू शकते?

पीडित व्यक्ती संयुक्त कुटुंबात राहण्यास हक्कदार आहे. तिचा कोणताही अधिकार असो व नसो, मिळकत तिच्या नावावर असो व नसो, अन्य कायद्याअंतर्गत इतर आदेश होईपर्यंत तिला तेथून कोणीही काढू शकत नाही. याव्यतिरिक्त पीडित व्यक्ती स्वत: किंवा त्या व्यक्तीला सेवा प्रदान करणारी व्यक्ती, आश्रयगृहाच्या प्रभारींना विनंती करून, पीडित व्यक्तीस आश्रय उपलब्ध करून दिला जाईल. आवश्यक असल्यास, तिला वैद्यकीय सुविधा संबंधित प्रभारींकडून, तिच्या विनंतीवरून उपलब्ध करून दिले जाईल.

या अधिनियमात संरक्षण आदेशाच्या अवमानाकरिता शिक्षेची तरतूद आहे का?

सुरक्षा आदेशाचा अवमान केल्याच्या कारणावरून २० हजार रुपये दंड आणि एक वर्षाचा तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. सुरक्षा आदेश एक संज्ञेय आदेश असून त्या आदेशाचा अवमान अजामीनपात्र गुन्हा आहे.

घरगुती हिंसाचारापासून पीडित व्यक्तींना संरक्षण व पिडा निवारण प्रदान करण्यात महाराष्ट्र

राज्य विधी सेवा प्राधिकरणाची काय भूमिका आहे?

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाची रचना विधी सेवा अधिनियम, १९८७ च्या अंतर्गत करण्यात आली आहे. प्राधिकरण ज्या महिलांना संरक्षणाची आवश्यकता आहे, त्यांना मोफत कायदेशीर सेवा साह्य प्राप्त करून देते. घरगुती हिंसाचार अधिनियमाच्या कलम '९ ड'नुसार पीडित महिलेस विधी सेवा प्राधिकरण अधिनियमांतर्गत कायेशीर साह्य मिळविण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण घरगुती हिंसाचाराने पीडित महिलांना नि:शुल्क विधी सेवा प्रदान करते.

घरगुती हिंसाचारांच्या प्रकरणांचा अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती आणि न्यायालयांच्या आदेशांची अंमलबजावणी :

टप्पा १ : तक्रार

व्यथित व्यक्ती संरक्षण अधिकार (प्रोटेक्शन ऑफिसर – पी. ओ.) किंवा सेवा पुरविणारे (सर्व्हिस प्रोव्हायडर) यांच्याकडे घरगुती हिंसाचाराची तक्रार घेऊन जाऊ शकते. जी तक्रार हिंसाचारासाठी तक्रार घेऊन जाऊ शकते, जी तक्रार घटना अहवाल (डोमेस्टिक इंन्सिडंट रिपोर्ट) यामध्ये नोंदविली जाते. त्यानंतर त्याच्या प्रती संबंधित न्यायदंडाधिकारी, स्थानिक पोलिस ठाणे आणि सेवा पुरविणारी (संस्था) (सर्व्हिस प्रोव्हायडर) यांच्याकडे पाठविल्या जातात.

टप्पा २ : अर्ज

व्यथित व्यक्तीस कायदेशीर कार्यवाही सुरू करावयाची असेल तर त्यानुसार अर्ज व त्यासोबत घरगुती घटना अहवाल (डीआयआर) संरक्षण अधिकारी (पी. ओ.) द्वारा न्यायालयात दाखल करण्यात येते. ज्या प्रकरणांत, व्यथित व्यक्ती थेट न्यायालयात गेली असल्यास अशा प्रकरणांत, न्यायालय अर्ज प्राप्त झाल्यानंतर संरक्षण अधिकारी (पी. ओ.) घरगुती घटना अहवालाची (डीआयआर) नोंद करून ती दाखल करण्याचे निर्देश देते .त्वरित (तातडीचे) अंतरिम दाद किंवा एकतर्फी वादी (आदेश) मंजूर होण्याकरिता प्रतिज्ञापन अर्जासोबत दाखल करावे. घरगुती हिंसाचार अधिनियमांतर्गत कार्यवाही न्यायिक दंडाधिकारी, प्रथम वर्ग किंवा महानगर दंडाधिकारी, ज्यांच्या स्थानिक हद्दीत, दोन्हींपैकी कोणीही पक्षकार राहत असेल किंवा लाभाकरिता (उत्पन्नासाठी) नोकरीकरिता असेल किंवा जेथे घरगुती हिंसाचाराची कथित घटना घडली असेल, त्यांच्या न्यायालयात दाखल करण्यात यावे. फौ. प्र. सं.च्या कलम १२५ खालील प्रकरणांकरिता जी पद्धती विहित केली आहे सर्वसाधारणपणे तीच पद्धती, घरगुती हिंसाचार अधिनियमांतर्गत अर्जाकरिता अवलंबिण्यात येते.

टप्पा ३ : नोटीस (सूचना)

अंमलबजावणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, न्यायालयीन उत्तरवादींना (विरुद्ध पक्षकारांना) न्यायालयात हजर होण्याकरिता नोटीस पाठवावी आणि संरक्षण अधिकारी (पी. ओ.) यांची जबाबदारी अशी, की त्यांनी खात्री करावी, की अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून दोन दिवसांच्या आत नोटिशीची बजावणी होईल.

टप्पा ४ : न्यायचौकशी

एकदा नोटिशीची बजावणी झाली, कि न्यायचौकशीचा आरंभ प्रथम सुनावणीने होतो. उत्तरवादीस (विरुद्ध पक्षकारास) कैफियत सादर करण्याची संधी दिल्यांनतर, शपथपत्राद्वारे पक्षकार आपापले पुरावे सादर करू शकतात. न्यायालय, तपासणी व उलटतपासणीकरिता पक्षकारांच्या साक्षीदारांस हजर राहण्यास फर्मावू शकते. जर उत्तरवादीने हजर राहण्यात कसूर केल्यास, न्यायालय त्याच्याविरुद्ध एकतर्फी निर्णय (आदेश) देऊ शकेल. कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर अंतरित आदेश देता येईल. न्यायालय पक्षकारांना सदर अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत समुपदेशनासाठी निर्देश देऊ शकेल.

टप्पा ५ : आदेश

सर्व साक्षी–पुराव्यांची नोंद झाल्यानंतर न्यायालय अंतिम निकाल देते. ज्याची अंम लबजावणी भारतातील कोणत्याही भागात करता येईल. न्यायालय, संरक्षण अधिकारी व पोलिस यांना आदेशाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने साह्य देण्यास निर्देश देऊ शकेल.

टप्पा ६ : आदेशभंग

संरक्षण आदेशाच्या भंगाची कृती, दखलपात्र आणि जामीनपात्र असा, घरगुती हिंसाचार अधिनियम,२००५ च्या कलम ३१ अंतर्गत गुन्हा आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत अपेक्षित वॉरंट प्रोसिजर (अधिपत्र कार्यपद्धती) आदेशभंगाच्या प्रकरणात अनुसरण्यात यावी.

आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९-ब, ४२-ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्रुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार म हिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंम लबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
'सुहिता' हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com